ePaper


## पटोले- थोरातांमध्ये समेट? पक्षाच्या बैठकीत दोन्ही नेत्यांच्या शेजारी बसून गप्पा



| वर्ष - 6 | अंक - 301 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


आतील पानांत


- बापटांना कसब्याची काळजी
- बेशिस्त वाहनचालकांना दणका!
- अलिबागकरांचा श्वास कोंडला
- भारत-चीन सीमेवरील सुरक्षा अधिक कडेकोट


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 16 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# राज ठाकरेंनी शब्द पाळला!

## अश्विनी जगतापः राज यांचे मानले आभार, मोठ्या भावासारखे माझ्या पाठीशी उभे राहिले

| पिंपरी | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी |

**पतीच्या निधनाचे दुःख अजून विरलेही नसताना पोटनिवडणुकीला सामोरे जाण्याची वेळ माझ्यावर आली. अशा कठीण प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि त्या पक्षाचे प्रमुख राज ठाकरे हे मोठ्या भावासारखे माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत. त्यांच्या या पाठिंब्याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहीन, अशा भावना अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठिंबा जाहीर केल्याबद्दल भाजप व मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले व त्यांच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत.**

यासंदर्भात अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, “माझे पती आणि शहराच्या विकासाचे शिल्पकार आमदार लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे आम्हा जगताप परिवारावरच नाही तर चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रत्येकांवर दुःखाचे डोंगर कोसळले. या दुःखातून सावरण्यासाठी राज्यातील आणि शहरातील अनेक नेत्यांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी आम्हाला आधार दिला. आमच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही आमच्या घरी येऊन दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच माझ्याशी संवाद साधून कोणत्याही प्रसंगात भावासारखे पाठीशी उभे राहण्याचे वचन त्यांनी मला दिले होते.



### राज ठाकरे यांची कायम ऋणी राहीन

» राज ठाकरे यांनी मला दिलेले हे वचन आज पाळले आहे. कारण त्यांनी पोटनिवडणुकीत भाजपाला म्हणजे मला पाठिंबा जाहीर केला आहे. मनसेचे नेते अनिल शिदोरे, बाबू वागस्कर, किशोर शिंदे यांनी भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, पक्षाचे प्रवक्ते एकनाथ पवार आणि प्रदेश सदस्य अनुप मोरे यांच्यासोबत बैठक घेऊन मनसेचा पाठिंबा दिला आहे. राज ठाकरे हे राज्यातील एक मोठे नेते आणि मनही मोठे असणारे नेते आहेत. त्यांच्यातील मोठेपणामुळेच चिंचवड पोटनिवडणुकीत मला त्यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. त्याबद्दल मी राज ठाकरे यांची कायम ऋणी राहीन.”

# भाजपाला मत म्हणजे दिवंगत लक्ष्मण जगताप यांना मत

## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकः खासदार श्रीरंग बारणे सुद्धा प्रचारासाठी मैदानात

| पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीची रणधुमाळी जोरात सुरू आहे. मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी बुधवारी (दि. १५) वाकड भागात नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या प्रचारासाठी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे हे सुद्धा प्रचारात मैदानात उतरले आहेत. चिंचवडमधील जनता सुज्ञ आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या विकासाला ते मत देतील आणि अश्विनी लक्ष्मण जगताप यांना एक लाखाच्या मताधिक्याने विजयी करतील, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.**



यावेळी भाजपाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, माजी उपममहापौर झामाबाई बारणे, नानी घुले, भाजपचे संघटन सरचिटणीस अमोल थोरात, शिवसेनेचे माजी नगरसेवक निलेश बारणे, सामाजिक कार्यकर्त्या करिष्मा बारणे, सुरेश राक्षे यांच्यासह भाजपा, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **“माझ्या पतीची आज जयंती होती. त्यांच्या आठवणी कधीच माझ्या मनातून जाणार नाहीत. आज जयंती असूनही ते दुःख बाजूला सारून प्रचारात उतरले आहे. चिंचवड मतदारसंघातील जनतेने अखंडपणे ४० वर्षे माझ्या पतीवर भरभरून प्रेम केले. त्यांच्या विकासाचा वारसा पुढे घेऊन जायचा आहे. त्यासाठी तुम्ही सर्वांनी साथ द्यावी आणि भाजपाच्या कमळ चिन्हावर मतदान करून मला विजयी करावे.**
> **- अश्विनी लक्ष्मण जगताप, उमेदवार, चिंचवड विधानसभा, भाजप**

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, “भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना मजबुतीने राज्याच्या गाडा हाकत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकारने राज्यातील नागरिकांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. या मजबूत सरकारला आपलीही तेवढीच साथ मिळायला हवी. चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपा आणि मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मतदान करावे. अश्विनी जगताप यांना मत म्हणजे लक्ष्मण जगताप यांना मत असणार आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहण्याची हीच खरी वेळ आहे. जनतेने अश्विनी लक्ष्मण जगताप यांना विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# बापटांना कसब्याची काळजी

## » कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकी बाबत फडणवीसांनी घेतली गिरीश बापट यांची भेट

**।पुणे । महाईन्यूज ।**

भाजपचे ज्येष्ठ नेते खासदार गिरीश बापट यांची भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा फुले वस्तु संग्रालय येथे येऊन भेट घेतली आणि तब्येती बाबत विचारपूस देखील केली.तर मागील आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील गिरीश बापट यांची भेट घेतली होती.

त्या भेटीनंतर कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकी बाबत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागील काही दिवसापूर्वी गिरीश बापट यांची भेट घेतील होती.मागील भेटीपेक्षा आताची तब्येत आधिक चांगली वाटली. या गोष्टीचा मला आनंद आहे. तसेच कसबा पोटनिवडणुकीची त्यांना काळजी आहे.प्रकृतीच्या कारणास्तव ते प्रचारामध्ये येऊ शकत नसले.तरी देखील त्यांनी मला काही टिप्स दिल्या आहेत. त्याच बरोबर आजारी असून देखील त्यांच या निवडणुकीकडे बारिक लक्ष आहे.या कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीत भाजप नीट पध्दतीने विजयी होईल.असा विश्वास देखील यावेळी त्यांनी व्यक्त केला.तसेच ते पुढे म्हणाले की, या निवडणुकी करता अमित शाह काही येत नाही.शिवसृष्टीच्या पहिल्या लोकार्पण सोहोळ्यास येत आहे.त्याच दरम्यान त्यांचे अनेक कार्यक्रम असून ते निवडणुकीच्या प्रचारात कुठे ही सहभागी होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मनसेवर यापूर्वी तुम्ही टीका केली होती. तरी देखील कसबा मतदारसंघात तुम्हाला मनसेच्या मदतीची गरज पडली आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की,निवडणुकीमध्ये सर्वांची मदत घ्यावी लागते.मनसेने हिंदुत्वाची भूमिका घेतली आहे.आता ते हिंदुत्ववादी ब्रेकयेटमध्ये येतात. त्या ब्रेकयेटमध्ये येणारे आम्हाला सर्व चालतात.अशी भूमिका त्यावर त्यांनी मांडली.



बीबीसी वृत्तवाहिनी आणि संकेतस्थळाच्या दिल्ली, मुंबईमधील कार्यालयांमध्ये प्राप्तिकर विभागाने छापा टाकल्याची घटना घडली.त्यानंतर विरोधक आक्रमक झाले असून आंदोलन करित आहे.त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की,तुम्ही किती ही खोटे मत तयार करण्याचा प्रयत्न केला.तरी देखील लोकांचा नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास आहे.अशी भूमिका अमित शाह यांनी मांडली आहे.तसेच २०२२ पासून नरेंद्र मोदी यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न काही नेत्याकडून तरी काही माध्यम समूहाकडून झाला आहे.त्यातून अधिक तेजाने मोदी जी बाहेर पडल असल्याचे त्यांनी सांगितले.

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कसब्याचे नेतृत्व करणारे खासदार गिरीश बापट यांच्या प्रकृतीची विचारपूस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केली. कसबा निवडणुकीकडे बापट यांचे बारीक लक्ष असून त्यांनी काही सूचना केल्या आहेत. बापट कुटुंबातील सदस्यही निवडणुकीच्या कामाला लागले आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.खासदार गिरीश बापट यांची प्रकृती गेल्या काही महिन्यांपासून खालावली आहे. शहरातील एका खासगी रुग्णालयात काही दिवसांपूर्वी त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यावेळी बापट यांची रूग्णालयात जात भाजपसह अन्य पक्षातील नेत्यांनीही भेट घेतली होती. बापट यांना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले आहे. गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बापट यांची निवासस्थानी भेट घेतली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली. शहराध्यक्ष जगदीश मुळीक, गिरीश बापट यांचे चिरंजीव गौरव यावेळी उपस्थित होते.

### मनसेने हिंदुत्वाचा मुद्दा हाती घेतला

» कसबा विधानसभा पोटनिवडणुकीतील प्रचारात सक्रिय होणार नसल्याचे बापट यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले होते. त्यामुळे बापट निवडणुकीच्या प्रचारात सक्रिय राहणार का, याबाबत चर्चा सुरू झाली असतानाच फडणवीस यांनी भेट घेतली. त्यामुळे ही भेटही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण मानली जात आहे.काही दिवसांपूर्वी बापट यांना भेटलो. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसत आहे. कसबा विधानसभा पोटनिवडणुकीची काळजी त्यांना आहे. त्यादृष्टीने त्यांचे बारीक लक्ष आहे. प्रचारात ते नसले तरी निवडणूक जिंकण्याच्या दृष्टीने त्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्याचा नक्की फायदा होईल. बापट यांच्या कुटुंबातील सदस्यही निवडणुकीच्या कामाला लागले आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.निवडणुकीसाठी सर्वांची मदत घ्यावी लागते. मनसेने हिंदुत्वाचा मुद्दा हाती घेतला आहे. त्यामुळे हिंदुत्वाशी संबंधित सर्व घटकांचे सहकार्य घेतले जाईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा पुणे दौरा निवडणुकीशी संबंधित नाही. ते निवडणूक प्रचारात सहभागी होणार नाहीत, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

---

# ‘ना पक्ष, ना नेता.. हौसला बुलंद होना चाहिये’!

## » चिंचवड विधानस पोटनिवडणूक : राहुल कलाटे यांनी भरला कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

‘ना पक्ष ना नेता, हौसला बुलंद होना चाहिये’ असे म्हणत चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी कार्यकर्त्यांमध्ये जबरदस्त उत्साह निर्माण केला. त्यांनी काढलेल्या पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



राहुल कलाटे हे महाविकास आघाडीच्या वतीने इच्छुक होते ऐनवेळी त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून शिट्टी या चिन्हावर निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. गेल्या दोन निवडणुकांचा अनुभव असलेल्या व मागील निवडणुकीत 1 लाख 12 हजार इतकी लक्षणीय मते मिळविलेल्या कलाटे यांनी वैयक्तिक भेटीगाठी, पदयात्रा याद्वारे अवघा चिंचवड मतदारसंघ पिंजून काढला आहे.

### सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा पाठिंबा

» काल त्यांनी रावेत, किवळे, पुनावळे या भागात पदयात्रा काढून मतदारांशी संपर्क साधला. रात्री काळेवाडी येथे युवा कार्यकर्त्यांशीही त्यांनी संवाद साधला. सुशिक्षित व तरुण मतदारांचा मोठा पाठिंबा कलाटे यांना लाभत असल्याचे दिसून आले.यावेळी कलाटे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ‘ना पक्ष ना नेता, हौसला बुलंद होना चाहिये असे सांगत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरला. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा त्यांना पाठिंबा मिळत असून त्यांच्या आत्मविश्वास पूर्ण लढाऊ वृत्तीमुळे ते तरुणांच्या पसंतीस उतरत असल्याचे दिसत आहे.

### बीआरटी मार्गातून येणाऱ्या 200 वाहनांवर दंडात्मक कारवाई

# बेशिस्त वाहनचालकांना दणका!

## » सांगवी वाहतूक पोलीसांची मोठी कारवाई : 15 दिवसांत विशेष मोहिमेत 13 लाख 87 हजारांचा दंड वसूल

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**सांगवी वाहतूक पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत पंधरा दिवसांत १३ लाख ८७ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच रक्षक चौक ते पिंपळे सौदागर बीआरटी लेन येथे आज पोलिसांनी कारवाई करत २०० वाहनांवर केसेस व दंड वसूल केला. या विशेष मोहिमेत पोलिसांनी बीआरटीएसमधून येणारी वाहने, पीटीपी नाकाबंदी, नो एन्ट्री, काळ्या काचेच्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. या १ ते १४ फेब्रुवारी पंधरा दिवसात बीआरटीएस मार्गामधून येणाऱ्या ९५० खासगी वाहनांवर कारवाई करत ६ लाख ३६ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.**



नो एन्ट्रीमध्ये येणाऱ्या वाहनांवर ७७ केसेस करत ६ लाख ८ हजार ६०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. काळी काच म्हणजे ब्लॅक फिल्म लावलेल्या १४० वाहनांवर कारवाई करत १ लाख ४९ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर पीटीपी नाकाबंदी दरम्यान १ हजार ९३१ वाहनांवर कारवाई करत १३ लाख ८७ हजार ७५० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

### 1 लाख 39 हजार रुपयांचा दंड आकारला

» दरम्यान आज बीआरटीएस मधून येणाऱ्या २०० खासगी वाहनांवर कारवाई करत १ लाख ३९ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. पीटीपी नाकाबंदीमध्ये ६४ वाहनांवर अनपेड दंड आकारत ४० हजार १०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. ही कारवाई या पुढेही अशीच सुरु राहील असे सांगवी वाहतूक विभागाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे यांनी सांगितले आहे.

# जयंतीसारखे शब्द लावताना काळीज जड होते, तुम्ही अजूनही आमच्यात आहात

## » लक्ष्मण जगताप यांच्या जयंतीनिमित्त पत्नी अश्विनी यांच्या भावना

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

तुमच्या नावापुढे आजही स्वर्गीय, जयंती असे शब्द लावताना काळीज जड होते. तुम्ही, तुमचे कार्य, तुमचा संघर्ष आणि तुमचे विचार आजही आमच्या अवतीभवती आहेत. तुम्ही पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी केलेले काम कधीही विसरता येणार नाही. तुम्ही अजूनही आमच्यात आहात, अशा शब्दांत डोळ्यात अश्रू अनावर झालेल्या अश्वनी लक्ष्मण जगताप यांनी त्यांचे पती व दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले.

पिंपरी-चिंचवडचे लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे ३ जानेवारी रोजी निधन झाले. १५ फेब्रुवारी हा दिवस त्यांचा जन्मदिवस. त्यानिमित्त बुधवारी त्यांची जयंती साजरी करण्यात आली. विविध राजकीय पक्ष, संघटनांकडून पिंपळेगुरव येथील स्मृतीस्थळावर जाऊन दिवंगत लक्ष्मण जगताप यांना अभिवादन केले. संपूर्ण जगताप कुटुंबानेही स्मृतीस्थळावर जात त्यांना अभिवादन केले. सध्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक सुरू आहे. भाजपने दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना उमेदवारी दिली आहे.



### चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक :

# मतदान प्रक्रियेसाठी मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया सुरु

## » 714 कंट्रोल युनिट, 1428 बॅलेट युनिट आणि 765 व्हीव्हीपॅट अशा एकूण 2907 मतदान यंत्रांचा समावेश

।पिंपरी चिंचवड ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदार संघ पोटनिवडणूकीच्या प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी मतदान यंत्रे तयार करण्याची (कमिशनिंग) प्रक्रिया आज सुरु झाली. यामध्ये ७१४ कंट्रोल युनिट, १४२८ बॅलेट युनिट आणि ७६५ व्हीव्हीपॅट अशा एकूण २९०७ मतदान यंत्रांचा समावेश आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी दिली आहे..**

त्याप्रमाणे मतदान यंत्रांची संगती करण्यात आल्यानंतर श्री. ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली कमिशनिंग प्रक्रियेला प्रारंभ झाला. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित पाटील, शिरीष पोरेडी, निवडणूक सहायक तथा तहसीलदार नागेश गायकवाड, प्रशांत शिंपी, ईव्हीएम व्यवस्थापन समन्वयक अधिकारी बापू गायकवाड, दिव्यांग कक्ष समन्वयक श्रीनिवास दांगट, माध्यम कक्ष समन्वयक किरण गायकवाड, नायब तहसीलदार संतोष सोनवणे यांच्यासह भेल इलेक्ट्रॉनिक्सचे तज्ञ, सेक्टर अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूकीसाठी थेरगाव येथील स्व. शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्रॉंग रूममध्ये सर्व मतदान यंत्रे आणण्यात आली आहेत. याठिकाणी



निवडणूक निरीक्षक एस. सत्यनारायण यांच्या विशेष उपस्थितीत आज सकाळी कमिशनिंग प्रक्रियेला सुरुवात झाली. उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. ईव्हीएम सिलिंगची प्रक्रिया विहित वेळेत पुर्ण करण्यात येणार असून, प्रत्यक्ष निवडणुक मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक सर्व प्रक्रिया विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी निवडणूक विभागाचे प्रत्येक टप्प्यावर नियोजनबद्ध कामकाज सुरु आहे, असे श्री. ढोले यावेळी म्हणाले.

प्रारंभी, मतदान यंत्राबद्दल निवडणूक कामकाज करणाऱ्या सेक्टर अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांना तज्ञ चंद्रकांत ढवळे आणि मुसाक काझी यांनी तांत्रिक माहितीचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.

दिव्यांग बांधवांना मतदान करणे सोयीचे व्हावे याद्दष्टीने बॅलेट युनिटवरील ब्रेल लिपी मध्ये असलेले दिशादर्शक स्टिकर आणि इतर ब्रेल लिपीची सविस्तर माहिती पताशीबाई मानव कल्याण अंधशाळा भोसरीचे मुख्याध्यापक पांडुरंग साळुंखे यांनी प्रशिक्षणार्थींना दिली.

त्यानंतर ईव्हीएम सिलिंगच्या प्राथमिक प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. निवडणुकीसंबंधी सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी निवडणूक विभाग कटिबद्ध असून उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना देखील ही संपूर्ण तांत्रिक प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवण्यात आली.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष पाहणी करून सूचना

» थेरगाव येथील स्व. शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूमची पाहणी केली तसेच या ठिकाणी असलेल्या सुरक्षेचा आढावा घेऊन सुरक्षा विषयक संबंधितांना सूचना दिल्या. तसेच या भवनामध्ये सुरु असलेल्या मतदान यंत्राच्या कमिशनिंग प्रक्रियेची जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सूचना दिल्या. तसेच मतदान केंद्र क्रमांक ६१ च्या सर्व कमिशनिंग प्रक्रियेची तपासणी आणि खात्री करून जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी स्वतः या केंद्राचे ईव्हीएम सिलिंग केले. दि. १४ फेब्रुवारी रोजी ७१४ कंट्रोल युनिट, १४२८ बॅलेट युनिट आणि ७६५ व्हीव्हीपॅट अशा एकूण २९०७ मतदान यंत्रांची संगणकीय प्रणालीद्वारे मतदान केंद्रनिहाय द्वितीय सरमिसळ (रँडमायझेशन) उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

## संपादकीय »


# शंका मंदीची, प्रतीक्षा संधीची

***अमेरिकेतील वाढते व्याजदर व भाववाढ, युरोपात ऊर्जेच्या आणि अन्य वस्तूंच्या वाढत चाललेल्या किंमती, चीनला युरोपसारखाच भेडसावणारा प्रश्न आणि गृहबांधणी क्षेत्रातील पडझड व चीनमध्ये वाढणारी कोविड रुग्णसंख्या यासारख्या घटनांमुळे या अर्थव्यवस्थांची प्रगती मंदावण्याची चिन्हे आहेत.***

महासाथीच्या तडाख्यातून जगातल्या अर्थव्यवस्था नुकत्याच सावरत असताना आता मंदीची कुणकुण कानी पडू लागली आहे. 'सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड बिझनेस रिसर्च''च्या अहवालात नमूद केलंय, की भाववाढ रोखण्यासाठी सर्वत्र व्याजाचे दर वाढविले जातायत, त्यातून मंदीची स्थिती येण्याची शक्यता आहे. व्याजाचे दर वाढले, की कर्जे महाग होतात आणि कर्जाची मागणी घटावी, अशी अपेक्षा ठेवून आणि रोखता कमी करून भाववाढ रोखावी, असा मध्यवर्ती बँकांचा प्रयत्न असतो. पण अशा धोरणामुळे एकूणच आर्थिक व्यवहार ठप्प व्हायची शक्यता असते. भाववाढ मात्र लगेच कमी होते, असं दिसत नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या अंदाजानुसार २०२३मध्ये जागतिक अर्थव्यवस्था दोन टक्क्यांपेक्षाही कमी दरानं प्रगती करण्याची शक्यता २५ टक्के असेल. अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह बँके'ने व्याजदर सातत्यानं वाढविल्याने २०२३मध्ये मंदीची शक्यता ५० टक्के असेल, आणि पुढल्या दोन वर्षांत त्याची शक्यता ७५ टक्के राहील, असेही निरीक्षण एका अभ्यासात आहे. म्हणजे मंदी २०२३ किंवा पुढल्या दोन वर्षांत येण्याची शक्यता १०० टक्क्यांपेक्षा कमीच आहे. सलग सहा महिन्यांच्या काळात आर्थिक विकासाचा दर उणे राहिला तर ती मंदीची परिस्थिती. मंदीची हीही व्याख्या काही अर्थतज्ज्ञांना मान्य नाही. उदाहरणार्थ, गेल्या दशकाच्या तुलनेत चीनचा आर्थिक विकासदर घटला, तरी त्या देशाचं सकल उत्पादन सलग दोन तिमाहीत घटत जाताना दिसेल, अशी शक्यता कमीच. आर्थिक उत्पन्नातली वाढ ०.३ टक्के (अमेरिका अदाज) होणं म्हणजे मंदी ही सर्वमान्य व्याख्या दिसते. अमेरिकेतील वाढणारे व्याजदर व भाववाढ, युरोपात ऊर्जेच्या आणि अन्य वस्तूंच्या वाढत चाललेल्या किंमती, चीनला युरोपसारखाच भेडसावणारा प्रश्न आणि गृहबांधणी क्षेत्रातील पडझड व चीनमध्ये वाढणारी कोविड रुग्णसंख्या ह्यासारख्या घटनांमुळे ह्या अर्थव्यवस्थांची प्रगती मंदावण्याची चिन्हे आहेत. या अर्थव्यवस्थांमध्ये अशी स्थिती येऊ घातली आहे. याला काही चुकीच्या आणि एकांगी धोरणांची पार्श्वभूमी आहे. उदाहरणार्थ २०११ ते २०२१ ह्या दशकात युरोपनं 'नैसर्गिक वायू''साठी आपलं रशियावरचं अवलंबित्व वाढवत नेलं. आता युद्धामुळे युरोपवर वेगळच संकट ओढवतं आहे, चीनच्या 'शून्य कोविड धोरणाची'' खूप मोठी आर्थिक झळ चीन आज अनुभवत आहे.

# अस्थिरतेकडे जाणारे जग आणि एंट्रॉपी



खरंच हे जग अस्थिरतेकडे चाललं आहे का, असा प्रश्न ज्यावेळेस आपल्या मनाला पडतो त्यावेळेस ह्या क्रियेची कुठेतरी सुरुवात झालेली असते. केवळ सामाजिक स्तरावर अस्थिरता दिसत नसून हवामान, राजकीय, स्वास्थ्य, अर्थकारण ह्या सगळ्याच बाबतीत याची जाणीव आता होत आहे. ग्रीस, ग्रीनलँड, श्रीलंका ही राष्ट्रे आर्थिक दिवाळखोरीत निघाली आहेत, तर पाकिस्तानसह कित्येक राष्ट्रे आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. अमेरिकेसारख्या आर्थिक महासत्तेपुढेही आज ढासळत चाललेली अर्थव्यवस्था सावरण्याचे एक मोठे आव्हान उभे आहे. एवढेच नव्हे तर युरोपीय राष्ट्रेसुद्धा आज आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत.

प्राईस वॉटर कुपर्स ही सेवाक्षेत्रातील जागतिक स्तरावरील द्वितीय क्रमांकाची तसेच लेखा क्षेत्रातील जगातील चार दिग्गज संस्थांपैकी एक संस्था आहे. ह्या संस्थेला पीडब्ल्यूसी (PWC) ह्या लघु नामाने ओळखले जाते. चालू वर्षाच्या (२०२३) सुरुवातीला पीडब्ल्यूसी या संस्थेने ज्या कंपन्या जागतिक अर्थकारणावर प्रभाव पाडू शकतात अशा काही कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे २६ वे सर्वेक्षण केले. पीडब्ल्यूसीच्या या सर्वेक्षणात जगातील १०५ राष्ट्रे आणि कंपन्यांच्या ४४१० मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (सीईओ) अर्थकारणाविषयी आपली मते नोंदवली.

जवळपास ४० टक्के सीईओंच्या मते जर त्यांच्या देशाची आर्थिक परिस्थिती अशीच चालू राहिली तर त्यांच्या कंपन्या येत्या १० वर्षांत तग धरू शकतील की नाही हे सांगता येणेही कठीण आहे. कित्येक सीईओंना तर असं वाटतं की येत्या दशकात कंपनीच्या भवितव्यासाठी व्यवसायाची पुनर्रचना करणे हा एक अवघड निर्णय आहे, तर ७५ टक्के सीईओंना असं वाटतं की येत्या वर्षात कंपनीची खालावत जाणारी परिस्थिती रोखणे हे एक मोठे आव्हान आहे. थोडक्यात जागतिक आर्थिक व्यवस्था विस्कळीत होत चालली आहे, परंतु ह्या अवस्थेचा परमबिंदू केव्हा गाठला जाईल हे निश्चित सांगता येत नाही.

जागतिकीकरणानंतर जगातील सर्वच राष्ट्रे एकमेकांजवळ आली आणि एकमेकांवरचे अवलंबित्व वाढले. त्यामुळेच ज्यावेळेस अमेरिकेत ट्विन टॉवरवर हल्ला झाला त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावरही झाला. रशियाच्या विभाजनानंतर काही काळ अमेरिका एकमेव महासत्ता म्हणून उरली असं वाटत असताना चीनने रशियाची जागा घेण्यास सुरुवात केली. चीनचे आक्रमक आर्थिक धोरण हे अमेरिकेच्या वर्चस्वाला एकप्रकारे कडवे आव्हान ठरत आहे. चीन सातत्याने शक्तिप्रदर्शन करीत आहे तर अमेरिकेकडे भविष्याबाबतचे निश्चित असे काहीही धोरण नाही. जपान, तैवान, व्हिएतनाम आदी देशांच्या हवाई क्षेत्रात चीन जाणीवपूर्वक घुसखोरी करीत आहे. नॉर्थ कोरिया आणि अमेरिकेमधील तणाव दिवसेंदिवस वाढतच चालला आहे, तर इराण, अमेरिकेच्या संबंधातही विशेष सुधारणा दिसून येत नाही. अमेरिकेचे तैवान, दक्षिण कोरिया यांच्याशी वाढत्या मैत्रीच्या संबंधामुळे चीन अस्वस्थ होत आहे. त्यातूनच चीनने दक्षिण कोरियाच्या कंपन्यांवर बंदी घातली. तैवान स्वतःला जरी स्वतंत्र देश समजत असला तरी चीन ही बाब मानायलाच तयार नाही. चीन आजही तैवानला आपल्या देशाचा भाग समजतो. चीनचे धोरण आधीपासून साम्राज्यवादी राहिले आहे. भारताच्या क्षेत्रातही चीनची अधूनमधून घुसखोरी चालूच आहे. अफगाणिस्तानमधे पुन्हा स्थापित झालेले तालिबानचे सरकार ही मानवी हक्कांना आव्हान देणारी घटना आहे. म्यानमारमधे नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी (एनएलडी) या सत्ताधारी पक्षाविरुद्ध १ फेब्रुवारी २०२१ रोजी लष्कराने उठाव करून सत्ता हाती घेतली. तत्कालीन म्यानमारचे प्रभारी अध्यक्ष मिन्त स्वे यांनी आणीबाणी घोषित करून सत्ता म्यानमार लष्कर (तत्मादव) कमांडर इन चीफ मिन ऑन्ग लायेंग यांच्याकडे सोपवली. ह्या घटनेचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पडसाद उमटले, मात्र दक्षिण पूर्व आशिया राष्ट्रसंघाने ही म्यानमारची अंतर्गत बाब म्हणून हात वर केले. रशियाच्या विभाजनानंतर स्वतंत्र झालेल्या आर्मेनिया आणि अझरबैजान यामधली धुगधुगही अधूनमधून युद्धाच्या रूपाने व्यक्त होताना दिसत आहे, तर बेलारूसमध्ये अवैध मार्गाने निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष वेलाशेंको विरुद्ध जनता रस्त्यावर उतरली होती. नाटो राष्ट्रे आणि युक्रेनमधील वाढत्या संबंधांची दखल घेऊन रशियाने आक्रमक भूमिका घेतली. युक्रेनला व नाटो सदस्य राष्ट्रांना धमक्या देऊनही विशेष फरक पडत नाही असे निदर्शनास आल्यानंतर रशियाचे राष्ट्रप्रमुख व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनवर थेट हल्ला केला.

# बाई गं, सुपरवुमन नको होऊस, त्यापेक्षा कमावती हो...

**जगभरात सगळीकडेच कमावत्या स्त्रियांचे प्रमाण घटत चालले आहे, असे जागतिक बँकेची आकडेवारी सांगते.**

महिलांच्या कामाची मोजदाद अधिक अचूकतेने होणे गरजेचे असल्याचे नुकत्याच सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारतात कमवत्या महिलांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत आणि विकसित देशांच्याही तुलनेत नेहमीच कमी असते. त्यामागची कारणे आपल्या संस्कृतीत आणि समाजव्यवस्थेत दडलेली आहेत... मांडली होती, तेव्हा तिला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्या वेळी, पंतप्रधानांनी जी-फोर आघाडीला अधिक महत्त्वाची भूमिका स्वीकारण्याचा आग्रह करून, धोरणांकडे 'झिरो सम गेम- देवाणघेवाणीचा खेळ' म्हणून पाहणे थांबविले पाहिजे यावर अधिक भर दिला होता.

आजघडीला सर्वत्र हवामान बदलाचा गंभीर परिणाम दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण मानव जातीच्या अस्तित्वालाच आजवरचा सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा संदेश अधिकच समर्पक ठरला आहे. भारताने



मांडलेली संकल्पना जागतिक नेत्यांना तसेच जगातील सर्व घटकांना म्हणजेच लघुत्तम सूक्ष्म जीवापासून सर्वात मोठ्या नागरी परिसंस्थेपर्यंत सर्व प्रकारच्या जैवरूपांच्या परस्परांशी असलेल्या संबंधांची तसेच हे सामायिक भविष्य कशा प्रकारे समान जबाबदारी आणि व्यक्तिगत हस्तक्षेपांना जन्म देते याची जाणीव करून देईल अशी आशा आहे. जून २०२२ मध्ये जागतिक बँकेने सादर केलेल्या अहवालानुसार २००५ पासून अर्थार्जनास सक्षम वयातील म्हणजे १५ वर्षे आणि त्यापुढील वयोगटातील कमावत्या मुली आणि महिलांचे प्रमाण २००५ पासून सातत्याने घटत चालले आहे. २०२१ मध्ये ते १९ टक्के एवढे घसरले होते. भारतासारख्या विकसनशील देशातील बहुसंख्य महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि अर्थार्जनाचा समतोल राखू शकेल अशा घरून करण्याच्या किंवा स्वतःच्या सोयीच्या वेळेनुसार करण्याच्या कामांना त्या प्राधान्य देतात. विकसित देशांतील स्थिती पाहता असे दिसते की महिलांचा अर्थार्जनातील सहभाग वाढत जातो, तसे प्रजोत्पादनाचे प्रमाण कमी होत जाते. शिवाय बालकांच्या संगोपनासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाचे प्रमाणही वाढू लागते.

भारतातही महिला अर्थार्जनात मागे पडण्यास बालक संगोपन हे एक महत्त्वाचे कारण आहे. देशाची आर्थिक विकासाची उद्दिष्टे गाठण्यासाठी महिलांचा संपत्तीनिर्मितीतील सहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे. आपल्या समाजव्यवस्थेत महिलेकडून असलेल्या अपेक्षांचा विचार करता, हे कसे साध्य करता येईल यावर विचार व्हायला हवा.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।  
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥  
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।  
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# चिंचवडची पोटनिवडणूक बेरोजगारी, महागाई अन् दादागिरीच्या विरोधात!

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष मेहेबूब शेख यांची भाजपवर टीका, नाना काटेंना विजयी करण्याचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज ।

**चिंचवड विधानसभेची पोटनिवडणूक ही देशात निर्माण झालेल्या बेरोजगारी, महागाई आणि दादागिरीच्या मुद्यांवर लढविली जात आहे. राष्ट्रवादीने सर्वसामान्यांची लढाई आता आपल्या हाती घेतली असून भाजपच्या हुकुमशाही कारभारातून मुक्त व्हायचे असेल तर परिवर्तन झालेच पाहिजे. भाजपने आपल्या सत्ताकाळा केवळ भुलथापा मारून नागरिकांची दिशाभूल केली आहे. त्यामुळे बदल घडविण्यासाठी सर्वांनी नाना काटे यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना विजयी करावे, असे आवाहन युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहेबूब शेख यांनी केले.**

पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने चिंचवड विधानसभेतील महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारार्थ पिंपळे सौदागर येथे बुधवारी (दि. १५) कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शेख बोलत होते.

या मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, युवक प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वर्पे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष राकेश कामटे, प्रदेश उपाध्यक्ष मयूर गायकवाड, विशाल वाकडकर, प्रदेश सरचिटणीस गौतम आगा, चिंचवडचे निरीक्षक महेश हांडे, प्रदेश सचिव डॉ. अरुण शिंदे, पुणे शहराध्यक्ष किशोर कांबळे, पुणे शहर कार्याध्यक्ष मनोज पाचपुते, अजिंक्य पालकर, ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष सचिन घोटकुळे तसेच पिंपरी चिंचवड युवक काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्याचे आयोजन पिंपरी चिंचवड युवक शहराध्यक्ष इम्रान



शेख आणि पदाधिकाऱ्यांनी केले होते. यावेळी युवक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना शेख म्हणाले की, आमचा विरोध भाजपच्या हुकूमशाही व लोकविरोधी कारभारा बद्दल आहे. देशात गेल्या ७० वर्षांत इतरांनी काहीच केले नाही, केवळ भाजपने विकास केल्याच्या भूलथापा मारल्या जात आहेत. सर्वांनी आता भाजपचा खोटारडेपणा ओळखला आहे. देशाचाच नव्हे तर पिंपरी-चिंचवड विकास केवळ आणि केवळ राष्ट्रवादीच्याच काळात झाला, हे सत्य सर्वांनीच मान्य केले आहे. हिंजवडीसारखी आयटीनगरी उभारण्याचे श्रेयही शरद पवार यांनाच जाते. भाजपच्या काळात केवळ दादागिरी, भ्रष्टाचार आणि भूलथापा याच बाबी घडल्या आहेत. कोणताही विकासाचा अजेंडा न ठेवता केवळ जनतेमध्ये भ्रम पसरविणे हा एकमेव उद्योग या लोकांनी चालविला आहे. मात्र जनता हुशार आहे. त्यांना आता या बाबी समजल्या असल्यामुळे चिंचवडमध्ये यावेळी परिवर्तन घडणार आणि नाना काटे हे प्रचंड मताधिक्क्याने विजयी होतील, असा विश्वासही शेख यांनी बोलून दाखविला. यानंतर राष्ट्रवादीचे पिंपरी-चिंचवड शहर कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे यांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन केले. तसेच नाना काटे यांच्या विजयासाठी ताकदीने कामाला लागण्याच्या सूचना केल्या. यावेळी बोलताना प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वर्पे म्हणाले, महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे हे सध्या निवडणूक प्रचारात आघाडीवर असून त्यांची लोकप्रियता कमालीची वाढत आहे. त्यामुळे भाजपाला त्यांचा पराजय डोळ्यांनी दिसत असून त्यांनी केलेल्या कामावर न बोलता ते फक्त सहानभूतीवर निवडणूक लढत आहेत. प्रत्येक ठिकाणी भावनिकतेच्या मुद्द्यावर मते मागत आहेत. मात्र चिंचवडच्या जनतेला विकास आणि भावनिक मुद्दे कळत असल्यामुळे यावेळचे मतदार हे भावनिकतेवर नव्हे विकासाच्या अजेंड्यावरच होणार असल्याचे रविकांत वर्पे म्हणाले.

### हुकुमशाही पद्धतीने भाजपचा कारभार

यावेळी बोलताना युवकचे शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, भाजपने महाराष्ट्राचे प्रकल्प गुजरातला पळविले आहेत, त्यांनी गुजरातमध्ये जाऊन मतदान मागावे. पुणे जिल्ह्यातील तळेगावसह इतर अनेक प्रकल्प गुजरातला दान करून महाराष्ट्रातील युवकांना बेरोजगार करणाऱ्यांनी यापूर्वीही वेळोवेळी खोटी आश्वासने दिली. निवडणुकीनंतर त्यांनी एकही आश्वासन पूर्ण केले नाही. केवळ मनमानी आणि हुकुमशाही पद्धतीने भाजपचा कारभार सुरू आहे. त्यामुळे चिंचवडची निवडणूक ही हुकुमशाही विरुद्ध लोकशाही असून असून या लढाईत नाना काटे हे पन्नास हजारांहून अधिक मताधिक्क्याने विजयी होतील, अशी खात्रीच शेख यांनी बोलून दाखविली.

---

# ते आले..त्यांनी पहिलं ... आणि त्यांनी जिंकलं..!

## नाना काटे यांच्या थेरगाव परिसरातील प्रचारफेरीला दणदणीत प्रतिसाद !

।पिंपरी चिंचवड । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बुधवारी थेरगाव परिसरातील वातावरण काही निराळेच होते.. सकाळपासूनच रस्ते गर्दीने ओसंडू लागले.. ठिकठिकाणी मोठमोठ्या आकर्षक रांगोळ्या लक्ष वेधून घेत होते.. फटाक्यांची जोरदार आतषबाजी.. फुलांचा वर्षाव.. बाईकचा दणदणाट... अशा या प्रसन्न वातावरणात थेरगावकरांनी उत्सुकतेने 'त्यांची' वाट पाहत होते... तेवढ्यात 'ते आले.. त्यांनी पाहिलं.. आणि त्यांनी जिंकलं..!' ते होते चिंचवड विधानसभा मतदारसंघातील सर्वाधिक चर्चेतले आणि लोकप्रिय ठरलेले महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे !हे..**

जागोजागी त्यांच्या स्वागतासाठी जमलेला जनसमुदाय त्यांच्याशी हस्तांदोलन करीत शुभेच्छांचा वर्षाव करताना दिसला. महिलांनी त्यांचे औक्षण करीत त्यांना आशीर्वाद आणि सदिच्छा दिल्या तर तरुण मुला-मुलींची त्यांच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी झुंबड उडाली.

थेरगावात बुधवारी झालेल्या प्रचारफेरीत नाना काटे यांच्यासोबत



माजी नगरसेवक संतोष बारणे, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन भोसले, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, प्रेरणा बँकेचे माजी अध्यक्ष कांतीलाल गुजर, माजी नगरसेविका मायाताई बारणे, प्रेरणा सहकारी बँकेचे अध्यक्ष तुकाराम गुजर, माजी नगरसेवक कैलास बारणे, सतीश दरेकर, यांच्यासह गोरक्षनाथ पाषाणकर, विशाल नंदूशेठ बारणे, संभाजी बारणे, विशाल पवार, शरद वारणे, प्रशांत संपकाळ, प्रभाकर ववले, अभिजित आल्हाट, विजय गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्वच पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मतदारांच्या गाठीभेटी घेत निघालेले नाना काटे हे सर्वांचीच आस्थेने चौकशी करीत होते. चिंचवड विधानसभेमध्ये परिवर्तन घडवून विकास साध्य करावयाचा असेल तर मला तुमच्या सहकार्याची, आशिर्वादाची गरज आहे.

### हस्तांदोलन, सेल्फी, शुभेच्छांनी वाढला उत्साह !

थेरगावच्या बापुजीबुवा मंदिरामध्ये नारळ फोडून रॅलीला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर ही रॅली बापुजीबुवा नगर, जय मल्लार नगर, कैलास नगर, अशोका सोसायटी, बेलठिकानगर, गुजर नगर, गणेश नगर, वनदेवनगर, क्रांतीवीर नगरसह विविध परिसरातून प्रचारफेरी काढण्यात आली. चौका-चौकात नाना काटे यांचे थेरगावकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. ज्येष्ठ नागरिकांनी काटे यांना वेळी विजयाबद्दल आशिर्वाद दिले. नानांनी त्यांची आस्थेने विचारपूस केली. माता-भगिनींनी त्यांना भेटण्यासाठी मोठी गर्दी केली होती. लहान मुले देखील आपल्या आवडत्या नानांचे स्वागत करायला थांबलेली होती. नानाही या चिमुकल्यांना उचलून घेत त्यांचे लाड करीत होते. त्यांच्यासोबत सेल्फी काढत होते.

# अलिबागकरांचा श्वास कोंडला!

## कचराभूमीतील आगीमुळे शहरावर धुराचे साम्राज्य

।अलिबाग। महाईन्यूज ।

**अलिबाग नगर पालिकेच्या डंपिंग ग्राउंड परिसरात लावलेल्या आगीमुळे रात्रीपासून शहर आणि लगतच्या परिसरात धुराचे साम्राज्य पसरले होते. त्यामुळे रात्रीपासूनच अलिबागकरांचा श्वास कोंडला होता. सकाळी दहा वाजेपर्यंत शहरातील अनेक भागांत धुराचे साम्राज्य पसरले होते. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.**

घन कचऱ्याचे व्यवस्थापन करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. मात्र अलिबाग जवळील गोविंद बंदर परिसरात नगरपालिका आणि आसपासच्या ग्रामपंचायती खाडीलगतच्या परिसरात कचरा टाकतात. कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता बरेचदा कचऱ्याला आग लावली जाते ज्यामुळे आसपासच्या परिसरात धुराचे साम्राज्य पसरते. धुरामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन वयोवृद्ध आणि लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो.संध्याकाळी या डंपिंग ग्राउंड परिसरात आग लागली होती. ज्यामुळे धुराचे लोट शहरालगत परिसरात पसरले होते. मध्यरात्रीच्या वेळी कोंदट वातावरण तयार झाले होते. सकाळीही धूर आणि धुकाची चादर संपूर्ण शहरावर पसरली होती. धुरामुळे डोळे चुरचुरणे, धुरकट



वासाचा त्रास जाणवत होता. दहा वाजेपर्यंत हीच परिस्थिती कायम होती. अस्थमा आणि श्वसनाचे विकार असलेल्यांना या धुराचा प्रचंड त्रास जाणवत होता. त्यामुळे डंपिंग ग्राउंड परिसरात लागलेल्या आगीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे. तसेच, आग लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

अलिबाग शहरात सकाळी सर्वत्र धुर पसरला होता. जो दम्याच्या रुग्णांसाठी अतिशय त्रासदायक असतो. लहान मुलांनाही या धुराचा प्रचंड त्रास होतो. सर्दी खोकल्याचा त्रास अधिकच बळावू शकतो. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने हिवाळ्यात कचरा जाळण्याचे प्रकार थांबवायला हवेत, असे बालरोगतज्ज्ञ डॉ. विनायक पाटील म्हणाले.

### कारवाई करण्याची मागणी

»संध्याकाळी या डंपिंग ग्राउंड परिसरात आग लागली होती. ज्यामुळे धुराचे लोट शहरालगत परिसरात पसरले होते. मध्यरात्रीच्या वेळी कोंदट वातावरण तयार झाले होते. सकाळीही धूर आणि धुकाची चादर संपूर्ण शहरावर पसरली होती. धुरामुळे डोळे चुरचुरणे, धुरकट वासाचा त्रास जाणवत होता. दहा वाजेपर्यंत हीच परिस्थिती कायम होती. अस्थमा आणि श्वसनाचे विकार असलेल्यांना या धुराचा प्रचंड त्रास जाणवत होता. त्यामुळे डंपिंग ग्राउंड परिसरात लागलेल्या आगीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे. तसेच, आग लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

अलिबाग नगरपालिका दरवर्षी कचरा व्यवस्थापनासाठी साडेसहा कोटी रुपयांचा खर्च करते. कचरा व्यवस्थापनासाठी येवढा निधी खर्च करूनही जर आग लावून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असेल, आणि जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे ही खेदजनक बाब आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई व्हायला हवी, असे सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत म्हणाले. अज्ञातांकडून ही आग लावली गेली असल्याचा संषय असून, सदर आग विझविण्यासाठी अलिबाग नगरपालिकेचे कर्मचारी रात्रीपासूनच प्रयत्नशील आहेत, असे अलिबाग नगर पालिका आरोग्य विभागाचे कर्मचारी नामदेव जाधव म्हणाले.

---

## पिक्चर अभी बाकी है? शरद पवारांवरील गौप्यस्फोटानंतर

# फडणवीसांचं आणखी एक मोठं विधान

।मुंबई। महाईन्यूज ।




**भारतीय जनता पार्टीचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच पहाटेच्या शपथविधीबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. शरद पवार यांच्याशी चर्चा करूनच मी अजित पवारांबरोबर शपथविधी घेतला होता, असं विधान फडणवीसांनी केलं. फडणवीसांच्या या विधानानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.**

या सर्व घडामोडींनंतर देवेंद्र फडणवीसांनी आणखी एक वक्तव्य केलं आहे. यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं आहे. शरद पवार आणि पहाटेच्या शपथविधीबाबत केलेल्या गौप्यस्फोटाबाबत विचारलं असता फडणवीस म्हणाले, मी अजून अर्धच बोललो आहे. दुसरी योग्य वेळ आल्यास उरलेलं जे काही आहे, ते सांगेन, असं विधान देवेंद्र फडणवीसांनी केलं आहे.पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मी एवढंच सांगेन की, मी जे काही बोललो आहे, ते सत्य बोललो आहे. त्याचे वेगवेगळे अर्थ तुम्ही लोकांनी काढले. पण मी काय-काय बोललो? ते तुम्ही शांतपणे बसून ऐका... म्हणजे तुम्हाला त्याची प्रत्येक कडी जोडता येईल. त्यावेळच्या माझ्या पत्रकार परिषदा बघा, त्यावेळी मी काय-काय बोललो आहे, तेही बघा. त्या सर्व गोष्टी तुम्ही बघितल्या तर तुम्हाला दुसऱ्या पुराव्याचीदेखील गरज पडणार नाही.

"पण मी अजून अर्धच बोललो आहे. उरलेल जे काही अर्ध आहे, ते दुसरी योग्य वेळ आल्यानंतर उर्वरित अर्धदेखील बोलेल," असं विधान देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. शिवाय फडणवीस आणखी काय बोलणार? याबाबत तर्क वितर्क लावले जात आहेत.

खरं तर, देवेंद्र फडणवीस आज पुण्यात आले होते. त्यांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते व खासदार गिरीश बापट यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बापट यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

---

# तुझं माझं जमेना, तुझ्या वाचून करमेना

## » पटोले-थोरात वाद मिटला!



। मुंबई । महाईन्यूज ।

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात यांनी आज एकत्र पत्रकार परिषद घेतली. यावेळी काँग्रेस एकसंघ असल्याचे नाना पटोले म्हणाले. नाशिक पदवीधर निवडणुकीनंतर या दोघांमध्ये नाराजीचे वातावरण होते.

बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ नेते पदाचा राजीनामा देखील दिला होता. दरम्यान थोरात आणि पटोले यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत नाराजींच्या चर्चांना पुर्णविराम दिला आहे.

नाना पटोले म्हणाले, भाजपकडून देशाची बदनामी करण्याचं काम होत आहे. शिंदे-भाजप सरकारकडून सत्तेचा दुरूपयोग होत आहे. मात्र आता हुकुमशाही सहन होणार नाही. काँग्रेस पक्षामध्ये कुठलाही वाद नाही. काँग्रेस एकसंघ आहे. नागपूर आणि अमरावतीची निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने हे वातावरण निर्माण केले होते. बाळासाहेब थोरात यांनी देखील सांगितले होते की आमच्यात वाद नाही. भाजपचा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न फोल ठरल्याचे पटोले म्हणाले.

# भारत-चीन सीमेवरील सुरक्षा अधिक कडेकोट!

## मोदी सरकारने उचलले एक महत्त्वाचे पाऊल

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**पाकिस्तानच्या अतिरेकी कारवायांवर नियंत्रण आणल्यानंतर चीनचाही बंदोबस्त करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आज, बुधवारी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्यामुळे भारतीय सैन्याकडून दोनदा मार खाणाऱ्या चीन सैनिक पुन्हा कुरापती करणार नाही, अशी अपेक्षा आहे.**



पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) भारत आणि चीन यांच्यात वारंवार संघर्षाचे प्रसंग निर्माण झाले. मे-जून 2020 तसेच गतवर्षी डिसेंबर महिन्यात चिनी सैनिकांनी आगळीक केली होती. भारतीय जवानांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये लष्करी पातळीवरील चर्चेच्या अनेक फेऱ्याही झाल्या आहेत. हे सर्व ध्यानी घेता केंद्र सरकारने सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत इंडो-तिबेट सीमा पोलिसांच्या (आयटीबीपी) 7 नवीन बटालियनच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयानुसार 9 हजार 400 कर्मचाऱ्यांच्या या 7 नवीन बटालियनसह एका ऑपरेशनल बेसची स्थापना करण्यात येणार आहे. त्यानंतर, 9 डिसेंबर 2022 रोजी अरुणाचल प्रदेशच्या तवांग सेक्टरमधील एलएसीनजीक यांगत्से येथे भारतीय जवान आणि चीनच्या पीएलएच्या (पीपल्स लिबरेशन आर्मी) सैनिकांमध्ये हाणामारी झाली. चिनी सैन्य यांगत्से भागात आल्यानंतर त्यांनी आधी झटापटीला सुरुवात केली. भारतीय जवानांनी सडेतोड प्रत्युत्तर देत त्यांना पळवून लावले. त्यात अनेक चिनी सैनिक जखमी झाले.

### भारत आणि चीन सैनिकांमधील संघर्ष वाढला

**पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यात पँगॉन्ग त्सो तलावाच्या उत्तरेकडील किनाऱ्यावर 1 मे 2020 रोजी दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये चकमक झाली होती. या चकमकीत दोन्ही बाजूचे अनेक सैनिक जखमी झाले. येथून उभय देशातील तणाव वाढला. 15 जून आणि 16 जून 2020च्या मध्यरात्री उभय देशांच्या सैनिकांमध्ये झालेल्या मारामारीत जीवितहानी झाली होती. गलवान खोऱ्यातील संघर्ष हा भारत आणि चीन यांच्यातील चार दशकांतील सर्वात प्राणघातक संघर्ष होता.**



# ‘पाकिस्तान झिंदाबाद’ नव्हे तर ‘पाकिस्तानसे जिंदा भाग’!

## पाकिस्तान सोडून जाणाऱ्यांची संख्या वाढली

।।नवी दिल्ली। महाईन्यूज।

पाकिस्तान आर्थिक संकटाचा सामना करत आहे. कर्जाचे हप्ते फेडण्यासाठीही पाकिस्तानच्या तिजोरीत पैसा उरलेला नाही. अशा स्थितीत पाकिस्तानसमोर डिफॉल्टचा धोका वाढला आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मदत मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागतेय. दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी देशाची दुर्दशा आणि विनाशाच्या मार्गावर चाललेल्या सरकारी तपास यंत्रणांवर टीका केली. लाहोरमध्ये दोन विकास प्रकल्पांची पायाभरणी करताना पीएम शहबाज यांनी दावा केला की, नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरो (एनएबी) च्या दुटप्पी मानकांमुळे पाकिस्तानला विनाशाकडे ढकलले आहे.

पाकिस्तान आज त्याच्या दयनीय परिस्थितीमुळे जगभरात चर्चेचा विषय बनला आहे. सर्वात मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानमध्ये दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे. देशातील महागाई २५ टक्क्यांच्या शिखरावर पोहोचली असून लोकांना जीवनावश्यक वस्तू आणि अन्नपदार्थांसाठी वणवण फिरण्याची वेळ आलीय. गव्हाचा साठा संपल्यानं इथल्या लोकांच्या ताटातून चपातीही गायब झाली आहे. गव्हाच्या एका पोत्यासाठी लोक मरायला तयार आहेत, अशा पद्धतीने इथे गव्हाच्या पिठासाठी युद्ध सुरू आहे. ज्या स्थितीकडे देशाची वाटचाल सुरू आहे, ती पाहता पाकिस्तानचं भविष्य अंधारात जाताना दिसत आहे. ही सर्व परिस्थिती पाहता इथले नागरिक पाकिस्तान देश सोडून जाताना दिसत आहेत. हा देश सोडणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत.




### पाकिस्तानमध्ये दिवसेंदिवस परिस्थिती बिकट

**पाकिस्तान आज त्याच्या दयनीय परिस्थितीमुळे जगभरात चर्चेचा विषय बनला आहे. सर्वात मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानमध्ये दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे. देशातील महागाई २५ टक्क्यांच्या शिखरावर पोहोचली असून लोकांना जीवनावश्यक वस्तू आणि अन्नपदार्थांसाठी वणवण फिरण्याची वेळ आलीय. गव्हाचा साठा संपल्यानं इथल्या लोकांच्या ताटातून चपातीही गायब झाली आहे. गव्हाच्या एका पोत्यासाठी लोक मरायला तयार आहेत, अशा पद्धतीने इथे गव्हाच्या पिठासाठी युद्ध सुरू आहे.**

# अखिलेश यादव, ओवैसींना मोठा दिलासा!

## न्यायालयानं फेटाळला विरोधातील अर्ज

।वाराणसी। महाईन्यूज।

उज्वल उपाध्याय यांच्या न्यायालयानं ज्ञानवापीच्या वाजूखानामधील गोंधळ आणि नेत्यांच्या वक्तव्याबाबत वकील हरिशंकर पांडे यांनी दाखल केलेला अर्ज फेटाळला.

हरिशंकर पांडे यांनी सपा प्रमुख अखिलेश यादव आणि एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्यावर द्वेषपूर्ण भाषण केल्यामुळं कारवाईची मागणी केली होती.

या नेत्यांनी अमर्याद आणि बेकायदेशीर विधानं करून हिंदू समाजाप्रती द्वेष पसरवण्याचं कृत्य केलंय, असा आरोप करण्यात आला होता. युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयानं आदेश राखून ठेवत 14 फेब्रुवारीची तारीख निश्चित केलीये.

ज्ञानवापी आवारात हातपाय धुतले जातात, घाण पसरवली जाते, असा आरोप करत वकील पांडे यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. हे स्थान आपल्या भगवान शिवाचं आहे. हा हिंदू समाजाचा अपमान आहे. यासोबतच एआयएमआयएम प्रमुख ओवैसी आणि सपा अध्यक्ष अखिलेश यादव आदींनी सर्वेक्षणात सापडलेल्या शिवलिंगाबाबत वादग्रस्त विधानं करून हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत, असाही आरोप करण्यात आला होता. हरिशंकर पांडे यांनी मौलाना अब्दुल वाकी, अंजुमन व्यवस्था समितीचे अध्यक्ष मौलाना अब्दुल बतीन नोमानी, समितीचे सहसचिव सय्यद मोहम्मद यासीन आणि निवेदन देणाऱ्या नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.



### नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**हे स्थान आपल्या भगवान शिवाचं आहे. हा हिंदू समाजाचा अपमान आहे. यासोबतच एआयएमआयएम प्रमुख ओवैसी आणि सपा अध्यक्ष अखिलेश यादव आदींनी सर्वेक्षणात सापडलेल्या शिवलिंगाबाबत वादग्रस्त विधानं करून हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत, असाही आरोप करण्यात आला होता.हरिशंकर पांडे यांनी मौलाना अब्दुल वाकी, अंजुमन व्यवस्था समितीचे अध्यक्ष मौलाना अब्दुल बतीन नोमानी, समितीचे सहसचिव सय्यद मोहम्मद यासीन आणि निवेदन देणाऱ्या नेत्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.**

# पिंपरी-चिंचवड शहराच्या इतिहासातील 'सुवर्ण लक्ष्मण पर्ण' सदैव स्मरणात!

## » भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांची भावना

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची ओळख जागतिकस्तरावर व्हावी. 'स्मार्ट सिटी' म्हणून शहराचा लौकीक व्हावा. या करिता कायम सकारात्मक पुढाकार घेणारे लोकनेते दिवंगत लक्ष्मण जगताप यांचे कार्य उद्योगनगरीच्या इतिहासातील 'सुवर्ण लक्ष्मण पर्ण ' म्हणून सदैव स्मरणात राहील, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**

चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे दि. ३ जानेवारी २०२३ रोजी निधन झाले. दि. १५ फेब्रुवारी रोजी प्रतिवर्षी स्वर्गीय आमदार जगताप यांचा वाढदिवस विविध सामाजिक, अध्यात्मिक उपक्रमांनी दिमाखात साजरा केला जातो. मात्र, यावर्षी प्रथम जयंती साजरी होत आहे. जगताप कुटुंबीय, भारतीय जनता पार्टीसह शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी, जगताप मित्र परिवार, समर्थकांनी सांगवी येथील दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप स्मृतीस्थळी भेट दिली. आमदार महेश लांडगे यांनी नतमस्तक होवून दिवंगत आमदार जगताप यांना अभिवादन केले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच, भाजपाच्या वतीने पक्षाच्या मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयातही दिवंगत आमदार जगताप यांचे प्रतिमापूजन करण्यात आले.

### दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना जयंतीदिनी अभिवादन







### पप्पा, आज असायला हवे होते...

»लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी-चिंचवडवर तळहातावरील फोडाप्रमाणे प्रेम केले. शहराला जपले. त्यांचे पिंपरी-चिंवचडला 'मेट्रो सिटी' करण्याचे स्वप्न होते. मात्र, पप्पा आपल्यातून निघून गेले. या शहराला त्यांची उणीव कायम भासत राहील. प्रत्येकवर्षी उत्साहात वाढदिवस साजरा होत होता. यावर्षी जयंती साजरी करावी लागते आहे. पप्पा सदैव आमच्या कुटुंबासोबत आणि शहरातील प्रत्येक नागरिकासोबत आहेत. "तुमच्या संस्कारांचा आणि विचारांचा वारसा नेटाने आम्ही पुढे चालवू, अचे वचन मी पप्पांना देते". पप्पांची खूप आठवण येतेय. आज पप्पा असायला हवे होते...अशा भावना दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची कन्या ऐश्वर्या रेणुसे- जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत.

# 'पुण्यात आली मिसळ खाऊन गेली!' श्रद्धाची जंगी मिरवणूक



बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं लाखो चाहत्यांचे मनोरंजन करणारी अभिनेत्री म्हणून श्रद्धा कपूरचे नाव घ्यावे लागेल. सध्याच्या घडीला सर्वोत्तम अभिनेत्री म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. मोठ्या प्रतिक्षेनंतर श्रद्धाचा एक नवा कोरा चित्रपट चाहत्यांच्या भेटीला येतो आहे. त्याच्या प्रमोशनसाठी श्रद्धा पुण्यात आली होती. त्यावेळी चाहत्यांच्या उत्साहाला भरते आले होते.

श्रद्धा पुण्यात आल्याचे कळताच तिच्या चाहत्यांनी आनंदोत्सव साजरा केला. पुण्यातील प्रसिद्ध मिसळचा तिनं आनंद घेतला. यावेळी तिनं माध्यमांशी, चाहत्यांशी संवाद साधला. तिला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादानंतर श्रद्धाही हरखून गेल्याचे दिसून आले. सोशल मिडीयावर देखील त्याचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. श्रद्धानं तिचा व्हॅलेंटाईन डे पुण्यात साजरा केल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.श्रद्धा कपूर बॉलीवूड मधील प्रसिद्ध अभिनेत्रींनपैकी एक असून, तिचा चाहतावर्ग मोठा आहे यात शंका नाही. अलीकडेच, श्रद्धाचा आगामी चित्रपट 'तू झूठी मैं मक्कार'चा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, याची चर्चा सर्वत्र रंगताना दिसत आहे. या सिनेमाच्या प्रमोशनसाठी श्रद्धाने पुणेकरांना भेट दिली. अशातच, व्हॅलेंटाइन डेच्या खास प्रसंगी पुण्यातील एका कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना गुलाब देत श्रद्धाने हा खास दिवस सेलिब्रेट केला. याशिवाय तिनं विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना उत्तरही दिली आहेत. श्रद्धानं पुण्यातील प्रसिद्ध मिसळचा आनंद घेत नव्या चित्रपटाविषयीच्या काही गोष्टींना उजाळा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर अभिनीत 'तू झूठी मैं मक्कार'या चित्रपटाच्या प्रदर्शनाची दर्शक आतुरतेने वाट पाहत आहेत. लव फिल्म्सचे लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित 'तू झूठी मैं मक्कार'या चित्रपटाचे दिग्दर्शन लव रंजन यांनी केले आहे. तसेच, टी-सिरीजचे गुलशन कुमार आणि भूषण कुमारद्वारा प्रस्तुत हा चित्रपट, 8 मार्च 2023 रोजी होळीच्या दिवशी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटाच्या गाण्यांना देखील चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे.त्याचं कौतूकही त्यांनी केलं आहे.

# 'पठाण'साठी 'व्हॅलेंटाईन डे' लकी

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान हा गेले काही दिवस सातत्याने चर्चेत आहे. शाहरुखच्या 'पठाण' चित्रपटाने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई केली. या चित्रपटाने अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहेत. २५ जानेवारीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी ५७ कोटींची कमाई केली. त्यानंतर आत्तापर्यंत जगभरात या चित्रपटाने ९०० कोटीहून अधिक कमाई केली आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने इतिहास रचला आहे.

भारतात आजवर सर्वाधिक जास्त कमाई करणाऱ्या आमिर खानच्या 'दंगल' या चित्रपटालाही 'पठाण'ने मागे टाकलं आहे. यात 'व्हॅलेंटाईन्स डे' या खास दिवसाने आणखी भर घातली आहे. या दिवसाच्या निमित्ताने काही चित्रपटगृहात 'DDLJ' हा शाहरुख काजोलचा चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्यात आला होता. या पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटानेही बॉक्स



# अभिनय नव्हे तर मेकअप आर्टिस्ट म्हणून काम करणार वीणा जगताप...




मराठीमधील बऱ्याच अभिनेत्री आपलं काम सांभाळत व्यवसाय करत आहेत. क्रांती रेडकर, प्राजक्ता माळी, अभिज्ञा भावे अशा काही अभिनेत्रींनी व्यावसायिका म्हणून काम सुरू केलं. आता यामध्ये आणखी एका अभिनेत्रीची बहुदा भर पडणार आहे. मराठी मालिक व 'बिग बॉस मराठी'च्या दुसऱ्या पर्वामुळे नावारुपाला आलेली अभिनेत्री वीणा जगताप एक नवी सुरुवात करणार आहे.अभिनेत्री वीणा जगतापने नुकतंच तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टद्वारे तिने मी एक नवी सुरुवात करत आहे असं म्हटलं आहे. पण या पोस्टबरोबरच वीणाने शेअर केलेला फोटो विशेष लक्षवेधी ठरत आहे. या फोटोमध्ये वीणा एका मुलीला मेकअप करताना दिसत आहे.

वीणाच्या या पोस्टवरुन ती आता मेकअप आर्टिस्ट म्हणून काम करणार का? असा प्रश्न चाहते विचारत आहेत. "तू मेकअप आर्टिस्ट म्हणून काम करणार का?" असा प्रश्न एका चाहतीने वीणाला विचारला. यावर वीणाने कमेंट्सच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. वीणा म्हणाली, "अजूनतरी मी मेकअप आर्टिस्ट झालेली नाही. पण नवीन काहीतरी प्रयोग करण्यामध्ये काय वाईट आहे?"

वीणाच्या या कमेंटमधून ती मेकअप आर्टिस्ट म्हणून स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण करू इच्छित आहे असं दिसून येतं. "किसी को घर से निकलते ही मिल गई मंज़िल, कोई हमारी तरह उम्र भर सफ़र में रहा. मी माझ्या आयुष्यामध्ये काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न करत आहे. मी आशा करते की हा नवा प्रवास चांगला असेल." असं वीणाने पोस्ट शेअर करत म्हटलं.

# अखिल भारतीय सिंगल संघटनेचे सदस्य..." प्राजक्ता



अभिनेत्री प्राजक्ता माळी संपूर्ण महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री आहे. अभिनयाबरोबरच प्राजक्ता उत्तम नृत्यांगणा आणि सूत्रसंचालिकाही आहे. प्राजक्ताने काही दिवसांपूर्वीच 'प्राजक्तराज' म्हणून तिचा नवा ज्वेलरी ब्रँड सुरू केला. आता कलाक्षेत्राबरोबरच तिने व्यावसायिक म्हणूनही काम पाहणं सुरू केलं आहे. कामाव्यतिरिक्त प्राजक्ताच्या खासगी आयुष्याबाबतही बऱ्याच चर्चा रंगतात. प्राजक्ता कोणाला डेट करत आहे का? अशाही याआधी बऱ्याच चर्चा रंगल्या. काही दिवसांपूर्वीच प्राजक्ताने एका मुलाखतीत तिच्या रिलेशनशिपबाबत भाष्य केलं होतं. चार वर्षांपूर्वी मी डेटला गेली असल्याचं तिने यावेळी सांगितलं. पण खरंच प्राजक्ता सिंगल आहे का? या प्रश्नाचं उत्तर प्राजक्ताने स्वतः दिलं आहे. व्हॅलेंटाईन डेनिमित्त प्राजक्ताने तिचे लाल रंगाच्या साडीमधील काही फोटो शेअर केले आहेत. हे फोटो शेअर करताना तिने म्हटलं की, "तुम्ही स्वतःचेच व्हॅलेंटाइन व्हा. हाच झोन पुढे सुरू राहील. अखिल भारतीय सिंगल संघटनेचे सदस्य तुम्ही एकटे नाही मीही तुमच्यामध्ये सहभागी आहे."

# भारताची विजयी घोडदौड सुरूच!

## » वेस्ट इंडीजवर सहा विकेट्सने मात, दीप्ती ठरली विजयाची शिल्पकार

। मुंबई।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या महिला टी२० विश्वचषकात भारतीय विरुद्ध वेस्ट इंडिज सामन्याला केपटाऊन येथे संपन्न झाला. टीम इंडियाने वेस्ट इंडीजवर सहा गडी राखून मात करत विश्वचषकातील दुसऱ्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला. भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर हिला पुन्हा एकदा नाणेफेक जिंकण्यात अपयश आले. नाणेफेक जिंकलेल्या वेस्ट इंडीज संघाने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. या सामन्यातून भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मंधानाने पुनरागमन केले. पुणेकर अष्टपैलू देविका वैद्य हिलादेखील संघात संधी मिळाली होती.**

केपटाऊन येथे झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने प्रथम गोलंदाजी करताना वेस्ट इंडीजला ६ बाद ११८ धावांवर रोखले. अनुभवी अष्टपैलू दीप्ती शर्मा हिने तीन विकेट्स मिळवत भारतासाठी सर्वोत्तम गोलंदाजी केली. याचबरोबर तिने भारतासाठी पुरुष व महिला क्रिकेटमध्ये मिळून सर्वाधिक आंतरराष्ट्रीय टी२० बळी मिळवण्याचा कारनामा केला. तिला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. वेस्ट इंडीज ठेवलेल्या ११९ धावांचे माफक आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली. पहिल्या दोन षटकातच ५ चौकार मारत स्मृती मंधाना आणि शफाली वर्मा यांनी कॅरेबियन गोलंदाजांवर बरसल्या. मात्र स्मृती १० धावांवर बाद झाली. पाकिस्तान



विरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट खेळी करणारी जेमिमाह अवघ्या एका धावेवर बाद झाली. सलामीवीर शफाली वर्मा चांगल्या फॉर्मात होती मात्र खराब फटका खेळून ती बाद झाली. तिने २८ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि यष्टीरक्षक रिचा घोष यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली. त्याच्या जोरावर भारताने विश्वचषकातला दुसरा विजय साकार केला. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३३ धावा करून बाद झाली तर रिचा घोष ४४ धावा करून नाबाद राहिली. वेस्ट इंडीजकडून करिश्मा रामहारकने सर्वाधिक २ तर हेली मॅथ्यूजने आणि चिनेल हेन्रीने प्रत्येकी १ विकेट घेतली.

तत्पूर्वी, सध्या गोलंदाजीच्या शानदार फॉर्म मध्ये असलेल्या दीप्तीने या सामन्यात सर्व क्षणी गोलंदाजी केली. पॉवर प्ले, मधली षटके तसेच डेथ ओवर्समध्ये तिने गोलंदाजी केली. तिने आपल्या चार षटकांमध्ये केवळ १५ धावा देत तीन फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. यासोबतच तिने टी२० क्रिकेटमध्ये शंभर विकेट्स पूर्ण केले. अशी कामगिरी करणारी ती पुरुष व महिला मिळून पहिलीच भारतीय गोलंदाज ठरली.या सामन्याचा विचार केल्यास भारतीय गोलंदाजांनी प्रथम गोलंदाजी संधी मिळाल्यावर वेस्ट इंडीज संघाला दबावात ठेवले. कर्णधार मॅथ्यूज दुसऱ्या षटकात बाद झाल्यानंतर टेलर व कॅम्पबेल यांनी ७३ धावांची भागीदारी केली. मात्र, त्यानंतर दीप्ती व इतर गोलंदाजांनी धारदार गोलंदाजी करताना वेस्ट इंडिजला ११९ पर्यंत मर्यादित ठेवले. दीप्ती व्यतिरिक्त पूजा वस्त्राकार व रेणुका सिंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

तिच्या आधी भारताची अनुभवी फिरकीपटू पुनम यादव हिने ९८ आंतरराष्ट्रीय टी२० बळी टिपलेले. या यादीमध्ये राधा यादव ६७ बळींसह तिसऱ्या स्थानी तर राजेश्वरी गायकवाड ५८ बहिण सह चौथ्या क्रमांकावर आहे. पुरुष क्रिकेटचा विचार केल्यास भारताचा अनुभवी फिरकीपटू युजवेंद्र चहल ९१ बळींसह पहिल्या क्रमांकावर दिसून येतो. तर, अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार हा ९० बळींसह दुसऱ्या व रविचंद्रन अश्विन ७२ बळींसह तिसऱ्या स्थानी काबीज आहे.

# ऐतिहासिक कामगिरी! वर्ल्ड क्रिकेटमध्ये टीम इंडियाचा जलवा

## » कसोटीसह तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर-1

।दुबई ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

टीम इंडियाच्या नावावर एक ऐतिहासिक सुपर विक्रम जमा झाला आहे. वास्तविक, भारतीय क्रिकेट संघाने अशी अद्भुत कामगिरी करून इतिहास रचला आहे. हा विक्रम गाठणे आतापर्यंत ऑस्ट्रेलियालाही जमलेले नाही. भारतीय क्रिकेट संघाने नवा इतिहास रचला असून अशी कामगिरी करणारा भारत हा दुसराच देश आहे. ICCने नवीनतम कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे, त्यानुसार भारत आता जगातील नंबर १ कसोटी संघ आहे. नागपूर कसोटीतील विजयानंतर भारताचे आता ११५ गुण झाले असून ऑस्ट्रेलियाचा संघ १११ गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे २०२३ पूर्वी भारतीय संघ टी२० इंटरनॅशनलमध्ये फक्त नंबर वन टीम होता. पण या वर्षाच्या



### टीम इंडियाचा ऐतिहासिक 'महाविक्रम'

**» यासह, भारतीय क्रिकेट संघाने इतिहास रचला आहे आणि त्याच वेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट, कसोटी, एकदिवसीय आणि टी२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये जगातील नंबर १ संघ बनला आहे. टीम इंडिया सध्या कसोटी, एकदिवसीय आणि टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये जगातील नंबर १ संघ आहे. भारतीय क्रिकेट संघाने पहिल्यांदाच ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे.**

सुरुवातीलाच टीम इंडियाने वन डे आणि कसोटीमध्ये अव्वल क्रमांक पटकावला आहे. न्यूझीलंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या मायदेशात खेळल्या गेलेल्या वन डे मालिकेत भारताने न्यूझीलंडचा ३-० असा धुव्वा उडवला आणि एकदिवसीय क्रमवारीत प्रथम क्रमांक पटकावला. न्यूझीलंडविरुद्धच्या वन डे मालिकेपूर्वी टीम इंडिया आयसीसी क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर आणि न्यूझीलंड पहिल्या क्रमांकावर होता. याशिवाय, कसोटी क्रिकेटमध्ये भारताने बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा एक डाव आणि १३२ धावांनी पराभव करून मोठा विजय नोंदवला. या विजयानंतर टीम इंडियाला कसोटी क्रिकेटमध्ये अव्वल क्रमांक मिळाला आहे. या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलिया पहिल्या क्रमांकावर तर भारत दुसऱ्या क्रमांकावर होता. मात्र भारताच्या विजयाने हा आकडा उलटला. नागपुरात खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्मानेही शतक झळकावून आयसीसी क्रमवारीत सुधारणा केली.

# सानिया मिर्झाची नवी इंनिग!

। बंगळुरू । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झाची महिला प्रीमियर लीगमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आरसीबीने बुधवारी आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवरून याची पुष्टी केली. यावर टेनिसपटू सानिया म्हणाली की, “तिला क्रिकेट संघाचा मार्गदर्शक बनण्याची ऑफर मिळाल्याचे काळातच खूप आश्चर्य वाटले होते, पण नंतर तिने ते स्वीकारले.”

आरसीबीच्या ट्विटर हँडलवर असे लिहिले आहे की, “महिलांसाठी भारतीय खेळातील एक अग्रणी, युवा आयकॉन जी तिच्या संपूर्ण कारकिर्दीत निर्भयपणे खेळली आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले, मैदानावर आणि मैदानाबाहेर चॅम्पियन आम्हाला तुझा अभिमान वाटतो,” असा उल्लेख करत आरसीबीने महिला क्रिकेट संघाची मार्गदर्शक म्हणून सानिया मिर्झाचे स्वागत केले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची




मार्गदर्शक बनल्यानंतर सानियाने एका सांघिक मुलाखतीत सांगितले की, “मला थोडे आश्चर्य वाटले, पण मी उत्साहित होते. सुदैवाने किंवा दुर्दैवाने, मी २० वर्षांपासून एक व्यावसायिक खेळाडू आहे. माझे पुढील काम मदत करणे हे आहे. तरुण स्त्रिया आणि युवक. मुलींना असा विश्वास देण्याचा प्रयत्न करणे की खेळ त्यांच्यासाठी करिअरचा पहिला पर्याय असू शकतो.”रॉयल चॅलेंजर्समध्ये ती काय बदल आणेल असे विचारले असता, मिर्झा म्हणाले की, “कोणत्याही खेळातील दबाव हाताळणे ही सर्वात महत्वाची बाब आहे आणि ती खेळाडूंसोबत त्यांच्या मानसिक पैलूवर काम करेल. ती म्हणाली, “क्रिकेट आणि टेनिसमध्ये खूप समानता आहेत. प्रत्येक खेळाडू सारखाच विचार करतो, त्याच दबावातून ते जातात. फक्त दबाव परिस्थिती हाताळणे, ते स्वीकारणे खूप महत्वाचे आहे.